राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी दि. ७, ८ व ९ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत पुकारलेल्या ३ दिवसांच्या पुकारलेल्या संपात सहभागी झालेल्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांचा अनुपस्थितीचा कालावधी नियमित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५१८/प्र.क्र.३४३/१६-अ
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ मे, २०१९.

वाचा :-सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संघटना १५१८/प्र.क्र. ३४३ /१६-अ,दि. ६ ऑगस्ट,२०१८.

प्रस्तावना :-

राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी त्यांच्या विविध मागण्यासंदर्भात दि.७, ८ व ९ ऑगस्ट,२०१८ या तीन दिवसाच्या संपाची नोटीस दिली होती. सदर संपात कर्मचाऱ्यांनी सहभागी होवू नये असे आवाहन संदर्भाधिन परिपत्रकान्वये करण्यात आले होते. या संपात सहभागी झालेले जे शासकीय कर्मचारी कार्यालयात अनुपस्थित होते त्यांची अनुपस्थिती नियमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि.७, ८ व ९ ऑगस्ट,२०१८ या तीन दिवसाच्या कालावधीत पुकारलेल्या संपामध्ये जे शासकीय अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते, त्यांची अनुपस्थिती सेवेतील खंड न समजता "असाधारण रजा" म्हणून नियमित करण्यात यावी. तथापि, सदर असाधारण रजेचा कालावधी शासन निर्णय वित्त विभाग, क्र. सेनिवे १००१/२९/सेवा ४, दि.१४.०१.२००१ च्या आदेशास अपवाद करुन सेवेतील खंड न समजता निवृत्तीवेतनासाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राहय धरण्यात यावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०५२८१३४६४३९७०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.05.28 13:49:50 +05'30'

(टि.वा.करपते)
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५.

४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई ३२
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ३२
१५. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान परिषद), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई ३२
१६. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान सभा), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२
१८. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ३२ (५ प्रती)
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्दीसाठी पाठवावे.
१९. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
२०. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२. राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२३. उपसचिव, (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२४. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय (बायोमेट्रिक उपस्थितीसंदर्भात),
२५. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२६. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती)
२७. निवड नस्ती (कार्यासन १६-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.